Sarda Education Society (Trust)'s
(A Linguistic Minority Educational Institute)

SMT RADHABAI SARDA ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE

ANJANGAON SURJI- 444705, DIST- AMRAVATI (Maharashtra)
(Affiliated to SantGadge Baba Amravati University, Amravati)

DR BASHISTH CHOUBEY
MA., PhD
Principal
Cell No.:9423853815

STD Code : 07224
Office : 295678
Website: www.rscollege.ac.in
E-mail: smtrscollege@gmail.com

No. Date:

# The following activities were conducted during session 2019-20

The college organizes and celebrates various national, regional and local festivals/days to inculcate communal integrity amongst the students. The college also celebrates birth and death anniversaries of eminent Indian personalities for making the students aware of the Indian historical past and their contribution in national development.

| Sr. No. | Name of the Activity | Organising unit/ agency/collaboration agency | Year of the Activity | Number of students participated in such activities/all staff of college |
|---|---|---|---|---|
| 1. | Rajashree Shahu Maharaj Jayanti | Healthy Practice | 26-6-2019 | 59 |
| 2. | Lokmanya Balgangadhar Tilak Jayanti | Healthy Practice | 23-7-2019 | 54 |
| 3. | Independence Day | Healthy Practice | 15-08-2019 | 220 |
| 4. | Sadbhavana Diwas | Healthy Practice | 20-08-2019 | 159 |
| 5. | Sawidhan Diwas | Healthy Practice | 26-11-2019 | 155 |
| 6. | Netaji subhashchandrabose | Healthy Practice | 23-1-2020 | 155 |
| 7. | Sant Sewalal Maharaj Jayanti | Healthy Practice | 15-2-2020 | 210 |
| 8. | ChhatrapatiShivajiMaharaj Jayanti | Healthy Practice | 19-02-2020 | 245 |
| 9. | Sant Rohidas Jayanti | Healthy Practice | 19-02-2020 | 210 |
| 10. | Sant Gadage Baba Jayanti | Healthy Practice | 23-02-2020 | 230 |
| 11. | Science Day | Healthy Practice | 28-02-2020 | 140 |
| 12. | Mahatma JotibaFule Jayanti | Healthy Practice | 11-03-2020 | 345 |
| 13. | Yashwantarao Chavan Jayanti | Healthy Practice | 12-03-2020 | 220 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14. | Sahid Din | Healthy Practice | 23-03-2020 | 230 |
| 15. | Dr.BabasahebAmbedkar Jayanti | Healthy Practice | 14-04-2020 | 200 |
| 16. | Maharashtra Din | Healthy Practice | 01-05-2020 | 38 |

SMT. R.S. COLLEGE Dist. Amravati ANJANGAON SURJI

Principal
PRINCIPAL
Smt.Radhabai Sarda
Arts, Commerce & Science College
Anjangaon Surji



**RAJASHREE SHAHU MAHARAJ JAYANTI**




**LOKMANYA BALGANGADHAR TILAK JAYANTI**



Independence Day - 15-08-2019



**INDEPENDANCE DAY**



**SADBHAVANA DIWAS**



**SAWIDHAN DIWAS**

**श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती**

**सुदृढ कार्यप्रणाली समिती**

**सत्र २०१९-२०**

***नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती***

**अहवाल**

**दि. २३ जानेवारी २०२०**

आजाद हिंद सेनाच्या माध्यमातून भारत मातेच्या स्वातंत्र्याकरिता स्वातंत्र चळवळ चालविणारे थोर स्वातंत्र्यसेनानी म्हणजेच "नेताजी सुभाषचंद्र बोस". त्यांनी देशातील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला. त्यांच्या असामान्य कर्तृत्वामुळे ते आजही भारतीय युवांचे प्रेरणास्थान आहेत. संपूर्ण युवा वर्ग त्यांच्या साहसी वृत्तीला सदैव सलाम करत राहील. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात आदरांजली वाहण्याकरीता कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बिना राठी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस हारार्पण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांनी पुष्पार्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी डॉ. सुजाता आठवले, डॉ. प्रतिभा आवंडकर, डॉ. प्रेरणा भटकर, डॉ. विवेक पाटील तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी आदरांजली वाहिली. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता श्री राजेंद्र मानकर, श्री चंद्रशेखर वडाळे, कु. नविता मालाणी, श्री. तानाजी गायगोले आदींचे सहकार्य लाभले.

केशव माकोडे
सदस्य, सुदृढ कार्यप्रणाली समिती

प्राचार्य
Principal
Smt.Radhabai Sarda College Of
Arts.Commerce & Science
Anjangaon Surji



**NETAJI SUBHASHCHANDRABOSE**

श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती
सुदृढ कार्यप्रणाली समिति
सत्र २०१९-२०

*संत सेवालाल महाराज जयंती*

**अहवाल**

दि. १५ फेब्रुवारी २०२०

महाराष्ट्राच्या मातीला जसा पराक्रमाचा वारसा आहे तसा संतांचा विचारांचा गंधही आहे. महाराष्ट्राला संतांची पुरातन परंपरा असुन त्यांच्या शिकवणीमुळेच आज संपूर्ण समाज गुण्यागोविंदाने नांदत आहे. समाजातील वाईट चालीरीती, अज्ञान, जाती व्यवस्था नष्ट करण्याचे महत्वाचे कार्य संतांनी केले. संतांची हि शिकवण आजही आपल्याला दीपस्तंभाप्रमणे मार्गदर्शक ठरत आहे. संत सेवालाल महाराजांचे विचार भारतीय संत परंपरेतील भगवान महावीर,संत कबीर, संत बसवेश्वर, संत तुकाराम, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज यांच्या तोडीचे आहेत. परंतु त्यांचे विचार अलिखित असल्याने किंवा पुस्तक स्वरूपात उशिरा प्रसिद्दीस आल्याने जनसामन्यात त्यांची फारशी माहिती नसावी.

सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १८२४ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गुठी तालुक्यातील गोलाल डोडी गावात झाला. ते बंजारा समाजाचे सतगरु होते. अश्या थोर संताच्या जयंतीचे औचित्य साधुन सुदृढ कार्यप्रणाली समिती अंतर्गत श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे संत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली.

या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे, प्रा. डॉ. प्रदीप वाकोडे, श्री. चंद्रशेखर वढाळे इत्यादींची उपस्थिती लाभली. याप्रसंगी आपल्या मार्गदर्शनात डॉ. चौबे यांनी संत सेवालाल महाराजांचे जीवन व विचार यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी देखील पुष्पार्पण करून संत सेवालाल महाराजांच्या पावन स्मृतीस अभिवादन केले.

**केशव माकोडे**
सदस्य, सुदृढ कार्यप्रणाली समिती

प्राचार्य
Principal
Smt.Radhabai Sarda College Of
Arts.Commerce & Science
Anjangaon Surji

# SANT SEWALAL MAHARAJ JAYANTI

श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

सुदृढ कार्यप्रणाली समिती

सत्र २०१९-२०

*छत्रपती शिवाजी महाराज जयंती व संत रोहिदास जयंती*

अहवाल

दि. १९ फेब्रुवारी २०२०

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती व मध्ययुगीन भारतातील हिंदू संत म्हणून ख्याती प्राप्त असलेले संत रोहिदास यांच्या जयंतीचे औचित्य साधून सुदृढ कार्यप्रणाली समिती द्वारा महाविद्यालयामध्ये आदरांजली समर्पणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांनी संत रोहिदास व छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहिली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात छत्रपतींच्या साहसी आणि पराक्रमी वृत्तीविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच संत रोहिदास यांच्या जयंतीचे औचित्य साधून संत रोहिदासांनी केलेल्या समाज सुधारणे विषयी सखोल मार्गदर्शन केले.

याप्रसंगी उपस्थितांपैकी श्री. अनिल पितळे, डॉ. सत्येंद्र गडपायले, डॉ. माला बारापात्रे, श्री. इंदल जाधव, नितीन गोमासे व चतुरानंद केदार आदींनी दोन्हीही महान विभुतीस पुष्पार्पण करुन आदरांजली वाहिली. सदर कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता पुष्कर सारडा, श्री. तानाजी गायगोले, संतोष सरोदे व अर्चना चौहान आदींचे सहकार्य लाभले.

केशव माकोडे
सदस्य, सुदृढ कार्यप्रणाली समिती

प्राचार्य
Principal
Smt.Radhabai Sarda College Of
Arts.Commerce & Science
Anjangaon Surji



छत्रपती शिवाजी महाराज जयंती व संत रोहिदास जयंती निमित्य उपस्थित प्राचार्य, शिक्षक व शिक्षके...

**CHHATRAPATISHIVAJIMAHARAJ JAYANTI AND SANT ROHIDAS JAYANTI**

श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

सुदृढ कार्यप्रणाली समिती

सत्र २०१९-२०

*संत गाडगे बाबा जयंती*

अहवाल

दि. २३ फेब्रुवारी २०२०

अवध्या महाराष्ट्राचमध्ये एक किर्तनकार, समाजसुधारक व संत म्हणून ख्याती प्राप्त असलेले निष्काम कर्मयोगी व्यक्तिमत्व तसेच आपल्या साधी राहणी आणि उच्च विचारांनी केलेलया महान कार्यामुळे अमरावती विद्यापीठास ज्यांचे नाव दिल्या गेले असे, म्हणजेच संत गाडगे बाबा. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधुन संत गाडगे बाबा यांच्या विचारांचा प्रसार समाजमनामध्ये सुजविण्याच्या हेतूने श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सुदृढ कार्यप्रणाली अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात संत गाडगे बाबा जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून डॉ. संगीता जवंजाळ तसेच डॉ. नितीन वानखडे, डॉ. बिना राठी इत्यादींची उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. संगीता जवंजाळ यांनी संत गाडगे बाबांच्या दशसूत्री संदेशाविषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास डॉ. पी. टी. वाकोडे, श्री. एम. के. गिरी तसेच डॉ. नितीन घोडीले आदींची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता श्री. चंद्रशेखर वढाळे व श्री राजेंद्र मानकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

Wakode
केशव माकोडे
सदस्य, सुदृढ कार्यप्रणाली समिती

प्राचार्य
Principal
Smt.Radhabai Sarda College Of
Arts.Commerce & Science
Anjangaon Surji



संत गाडगे बाबा जयंती निमित्य उपस्थित शिक्षक वृंद

**SANT GADAGE BABA JAYANTI**



**SCIENCE DAY**




**MAHATMA JOTIBAFULE JAYANTI**

**श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती**

**सुदृढ कार्यप्रणाली समिती**

**सत्र २०१९-२०**

*यशवंतराव चव्हाण जयंती*

**अहवाल**

दि. १२ मार्च २०२०

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. ते एक स्वतंत्रता सेनानी, सहकारी नेता, सामाजिक कार्यकर्ता आणि उत्कृष्ठ लेखकही होते. त्यांनी मुख्यमंत्री असतांना महाराष्ट्रतील शेतकरी हिताच्या अनेक सहकारी समित्यांची स्थापना केली. याव्यतिरिक्त राष्टीय राजकारण ते एक अग्रेसर नेता होते. कित्येकवेळी केंद्रीय कॅबिनेट मंत्री असतांना त्यांनी गृहमंत्री, रक्षामंत्री, वित्त व विदेश मंत्री म्हणून कारभार सांभाळला तसेच ते भारताचे पाचवे उपपंतप्रधान होते. सन १९६२ साली झालेल्या भारत-चीन सीमा विवाद पार्श्वभूमीवर खासकरून त्यांची देशाचे रक्षामंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. नाशिक लोकसभा क्षेत्रातून अविरोध निवडून येण्याचा बहुमान त्यांना प्राप्त आहे. अश्या या थोर नेत्याच्या जयंतीचे औचित्य साधून सुदृढ कार्यप्रणाली समिती अंतर्गत श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजिन करण्यात आले.

याप्रसंगी त्यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेस हारार्पण करण्यात आहे. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमास श्री. अनिल पितळे, श्री. चंद्रशेखर अंबुलकर, श्री. इंदल जाधव, डॉ. पवन राऊत, डॉ. नितीन घोडीले व डॉ. विवेक पाटील आदींची उपस्थिती लाभली.

**केशव माकोडे**
सदस्य, सुदृढ कार्यप्रणाली समिती

**प्राचार्य**
Smt. Radhabai Sarda College Of Arts, Commerce & Science Anjangaon Surji



यशवंतराव चव्हाण जयंती निमित्य आदरांजली वाहण्याकरिता उपस्थित महाविद्यालयातील शिक्षक वृंद

**YASHWANTARAO CHAVAN JAYANTI**

**श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती**

**सुदृढ कार्यप्रणाली समिती**

**सत्र २०१९-२०**

***शहीद दिवस***

**अहवाल**

**दि. २३ मार्च २०२०**

सन १९२८ मध्ये भारतांमधील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून 'सायमन कमिशन नावाचं शिष्टमंडळ आले होतं. त्यावेळी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला होता. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठी आक्रमणात लाला लजपतराय त्यांचा मृत्यू झाला. देशभक्तीने भारावलेल्या या तीनही क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा इंग्रज अधिकारी जॉन. पी. सँडर्स याला ठार मारले. ब्रिटीश पोलिस अधिकारी सॅण्डर्सची हत्या केल्याप्रकरणी २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली होती. त्यांच्या या बलीदानामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्याला नवी दिशा मिळाली. भारताला स्वतंत्र मिळवून देण्यासाठी स्वत:च्या प्राणाची आहुती देण्यारे थोर क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या स्मर्णार्थ देशभरात दरवर्षी शहीद दिवस-२३ मार्च रोजी साजरा केला जातो.

शहीद दिवसाचे औचित्य साधून सुदृढ कार्यप्रणाली समिती अंतर्गत श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे शहीद दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तरांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून आदरांजली वाहिली. या प्रसंगी श्री. इंदल जाधव, हेमंत कुकलकर व श्री. चंद्रशेखर वढाळे आदींनी आदरांजली वाहिली. सदर कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता अर्चना चौहान व छाया नायाडकर आदींचे सहकार्य लाभले.


**केशव माकोडे**
सदस्य, सुदृढ कार्यप्रणाली समिती

Principal
**प्राचार्य**
Smt.Radhabai Sarda College Of
Arts,Commerce & Science
Anjangaon Surji

**SAHID DIN**



**DR.BABASAHEBAMBEDKAR JAYANTI**



**MAHARASHTRA DIN**